1 JAN 2019

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षणच्या चार विषयांना युजीसीची पुन्हा मान्यता

## नववर्षाची युजीसीकडून भेट : एम.ए. इंग्रजी, गणित, अर्थशास्त्र तसेच एम. कॉम. व्हॅल्युएशन ऑफ रियल इस्टेट या विषयांचा समावेश

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

दूरशिक्षणच्या चार विषयांना युजीसीची पुन्हा मान्यता मिळाली. विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रातील १२ पैकी ८ विषयांना यापुर्वी मान्यता दिली होती. तर एम. एस्सी मॅथस्, एम. ए. इंग्रजी, एम. ए. अर्थशास्त्र, एम. कॉम. व्हॅल्युएशन ऑफ रियल इस्टेट या ४ विषयांची मान्यता रद्द केली होती.

युजीसीच्या अटींच्या पुर्ततेनंतर सोमवारी (दि. ३१) दूरशिक्षण अंतर्गत चार विषयांसाठी २०१८-१९ ते २०१९-२० या शैक्षणिक वर्षासाठी पुन्हा मान्यता देत, जानेवारीपासून प्रवेश प्रक्रिया सुरू करावी, अशा सूचना युजीसीने मेलव्दारे दिल्या आहेत. अधिकार मंडळाच्या मान्यतेने या चार विषयांची प्रवेश प्रक्रिया सुद्धा त्वरीत पूर्ण केली जाणार आहे. नवीन वर्षात युजीसीने दूरशिक्षणच्या विद्यार्थ्यांना एक प्रकारची भेट दिली आहे.

### विद्यापीठाच्या प्रयत्नाला यश



युजीसीच्या अटींची पुर्तता करीत, विद्यार्थी हित लक्षात घेवून, सलग चार महिने युजीसीकडे पाठपुरावा केला. विद्यापीठाच्या प्रयत्नांची दखल घेत या विषयांना युजीसीने मान्यता दिली. त्यामुळे विद्यापीठाच्या प्रयत्नाला यश आले म्हंटले तरी वावगे ठरणार नाही. विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणारे हे चार विषय आहेत. या सत्रापासून विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा प्रयत्न केला जाईल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी संधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा.

**कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर**, (शिवाजी विद्यापीठ)

दूरशिक्षण अंतर्गत एम. एस्सी मॅथस्, एम. ए. इंग्रजी, एम. ए. अर्थशास्त्र, एम. कॉम. व्हॅल्युएशन ऑफ रियल इस्टेट हे चार विषय शिकवले जात होते. २३ जून २०१७ ला युजीसीने नियमात बदल करीत विद्यापीठांना काही अटी घालून दिल्या. त्यानुसार यंदा या चार विषयांची मान्यता रद्द करीत, काही अटींची पुर्तता करण्याच्या सुचना दिल्या होत्या. या सुचनांनुसार विद्यापीठाने या विषयांसाठी प्रत्येकी एक सहयोगी प्राध्यापकाची नेमणूक केली आहे. तसेच स्टडी मटेरियल वितरण व्यवस्था, प्राथमिक सोयी-सुविधा, दूरशिक्षणसाठी लागणारे मनुष्यबळ यासह अन्य बाबींची पुर्तता करीत नोव्हेंबरमध्ये युजीसीला प्रस्ताव पाठवला होता. विद्यापीठाच्या या प्रस्तावाची दखल घेत युजीसीने या चार विषयांना मान्यता दिली. यामुळे विद्यापीठासह विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. मान्यता मिळालेल्या विषयांसाठी शेतकरी, नोकरदार, गृहीणी असे जवळपास २ ते ३ हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. शैक्षणिक वर्ष २०१८ मध्ये या विषयांच्या विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागले होते. युजीसीने पुन्हा मान्यता दिली आहे, जानेवारीमध्ये या विषयांकरिता प्रवेश प्रक्रिया सुरू झाली तर विद्यार्थ्यांना नक्कीच न्याय मिळेल. तसेच त्यांचे शैक्षणिक नुकसानही होणार नाही.



### चार विषयाची प्रवेश प्रक्रिया जानेवारीत सुरू होणार का?

युजीसीने दिलेल्या सूचनांनुसार या चार विषयांची प्रवेश प्रक्रिया सुरू करावयाची असेल, तर अधिकार मंडळाची मान्यता घ्यावी लागेल. अधिकार मंडळ मान्यता देणार का?, मान्यता दिली तर यामध्ये बराचसा वेळ जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुंळे इतर विषयांचे एक सत्र पूर्ण झाल्यानंतर या विषयांची प्रवेश प्रक्रिया सुरू होणार का? याकडे शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

- 1 JAN 2019

पुण्यनगरी



# सावित्रीच्या लेकींचा उच्च शिक्षणात टक्का वाढला

## शिवाजी विद्यापीठातील चित्र | ग्रामीण भागातील शैक्षणिक सजगतेचा परिणाम

■ कोल्हापूर / वैभव गोंधळी :

शतकानुशतके शिक्षणाच्या मूलभूत हक्कापासून वंचित असणाऱ्या सावित्रीच्या लेकींचे उच्च शिक्षणातील प्रमाण आशादायकरित्या वाढले आहे. शिवाजी विद्यापीठामध्ये पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्यामध्ये मुलींचे प्रमाण तब्बल ६१ टक्के आहे. ग्रामीण भागात उभे राहिलेले महाविद्यालयांचे जाळे आणि एकूणच वाढत गेलेली शैक्षणिक सजगता याचा सकारात्मक परिणाम दिसून येत आहे. पदव्युत्तर शिक्षणाच्या प्रमाणामध्ये आघाडीवर असलेल्या मुली मात्र संशोधनामध्ये मात्र काहीशा पिछाडीवर असल्याचे चित्र आहे.

समाज आणि कुटुंब व्यवस्थेमध्ये स्त्रीला नेहमीच दुय्यम वागणूक देण्यात येते. त्यातून त्यांच्यावर अनेक बंधने लादण्यात आली. स्वतःचे मत प्रकट करण्यासह स्त्रीचा शिक्षणाचा हक्क ही हिरावून घेण्यात आला. मात्र, त्यानंतर समाजसुधारकांनी केलेल्या प्रबोधनामुळे शिक्षणाविषयी जागृती निर्माण झाली. तर अलीकडील काही वर्षांत ग्रामीण भागात पसरलेल्या शिक्षणाच्या जाळ्यामुळे मुलींचे शिक्षणातील प्रमाण वाढले आहे.

गेल्या काही वर्षांत स्त्रियांचे उच्च शिक्षणातील प्रमाण कमालीचे वाढले आहे. याबाबत शिवाजी विद्यापीठातील मुलींच्या संख्येची आकडेवारी बोलकी आहे. सुरुवातीला या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या मुलींचे प्रमाण हे १८ टक्के इतके होते. आज हे प्रमाण वाढून पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक झाले आहे.



### मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढले



शिवाजी विद्यापीठ परीक्षेत्रात ग्रामीण भागातील महाविद्यालयांचे मोठे जाळे निर्माण झाले आहे. घरातून येऊन, जाऊन शिक्षण घेता येईल अशा ठिकाणी महाविद्यालये उभी राहिल्याने मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. पालकांची बदलती भूमिका, मुलींबाबत बदलत गेलेला दृष्टिकोन, महाविद्यालयांची वाढती संख्या, विद्यापीठ आणि शासनस्तरावर केले जाणारे प्रयत्न, या सर्व गोष्टींचा मुलींचे शिक्षणातील प्रमाण वाढण्यावर सकारात्मक परिणाम झाला आहे.

- डॉ. व्ही. एन. शिंदे, उपकुलसचिव शिवाजी विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठाच्या पहिल्या पदवी प्रदान कार्यक्रमात १९६४ मध्ये १०९४ विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान करण्यात आल्या. त्यामध्ये पदवी स्वीकारणाऱ्या मुलींची संख्या ही १९९ इतकी होती. २०१८ च्या पदवी प्रदान कार्यक्रमात एकूण ५० हजार ४४४ विद्यार्थ्यांना पदवी देण्यात आली. त्यापैकी पदवी स्वीकारणाऱ्या मुलांची संख्या ही २३ हजार ५०६ तर मुलींची संख्या २६ हजार ९३८ इतकी होती. पदवीपर्यंतच्या शिक्षणाबरोबरच विशेषा पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या ही लक्षणीयरित्या वाढली आहे. त्यामध्ये सध्या पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या मुलांची संख्या ही १ हजार ४२६ आहे. मुलींची संख्या २ हजार २२६ म्हणजे ६१ टक्के आहे. विशेष म्हणजे पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या मुलींपैकी बहुतांश मुली ग्रामीण भागातील आहे. या मुली प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत उच्च शिक्षणामध्ये ठसा उमटवत आहेत.

### संशोधनात मात्र पिछाडी

पदव्युत्तर शिक्षणामध्ये मोठ्या प्रमाणात मुलींची संख्या वाढली आहे. मात्र, पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर संशोधनामध्ये मात्र मुली पिछाडीवर आहेत. विद्यापीठमध्ये या वर्षी एम. फिल. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या मुले आणि मुलीची संख्या समसमान असून ती ९६ इतकी आहे. तर पीएच.डी.साठी प्रवेश मुलांच्या तुलनेत मुलीची संख्या केवळ ४० टक्के आहे. पीएच.डी.साठी प्रवेश घेतलेल्या मुलांची संख्या ४१५ तर मुलींची २७४ आहे.

लोकमत

# 'स्मार्टफोन'द्वारे करा वाहनाचे पार्किंग

## वापरा घरातील वीज : शिवाजी विद्यापीठातील संशोधन; संगणकशास्त्रातील विद्यार्थ्यांच्या नवकल्पना


अजय माने


रोहित आडनाईक


पुष्कर लाटकर


मुरली जाधव


पुष्कर कणंगलेकर

संतोष मिठारी ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** स्मार्टफोन हा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. या स्मार्टफोनचा विविध कामांसाठी वापर करण्याच्या कल्पना शिवाजी विद्यापीठाच्या संगणकशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी संशोधनातून मांडल्या आहेत. वाहनांचे पार्किंग, घर-कार्यालयातील वीज चालू-बंद करणे, सार्वजनिक ठिकाणावरील कचराकुंडी भरल्याची माहिती महानगरपालिका प्रशासनाला देण्याच्या कामात या संशोधनाचा उपयोग होणार आहे.

विजेचा वापर, वाहनांच्या पार्किंगसाठी जागेची उपलब्धता, कचऱ्याचे निर्गतीकरण, आर्दीबाबतच्या अडचणी आणि प्रश्नांना उत्तर शोधण्यासाठी शिवाजी विद्यापीठातील संगणकशास्त्रातील एमसीए आणि एम.एस्सी. अभ्यासक्रमाच्या द्वितीय आणि तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी संशोधन सुरु केले. या संशोधनात स्मार्टफोनचा वापर हा

**गुड न्यूज**
**नववर्ष २०१९**

संबंधित विद्यार्थ्यांनी केंद्रस्थानी ठेवला. त्यातील अजय माने, रोहित आडनाईक, मुरली जाधव आणि पुष्कर कणंगलेकर यांनी 'स्मार्ट स्विच ॲप'चे संशोधन मांडले.

कोणत्याही शहरात सध्या वाहनांच्या पार्किंगचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. त्याला पर्याय देण्यासाठी रोहित आडनाईक आणि मुरली जाधव यांनी स्मार्ट पार्किंग ॲप विकसित केले आहे. या ॲपच्या माध्यमातून पार्किंगसाठी कोणत्या ठिकाणी जागा उपलब्ध आहे ते आधीच जाणून घेता येते. त्यामुळे वेळ आणि इंधनाची बचत होणार असून, प्रदूषणदेखील कमी होण्यास मदत होणार आहे. या ॲपचा उपयोग शहर वाहतूक पोलीस विभागासह वाहनधारकांना होणार आहे. शहरातील सार्वजनिक कचराकुंडी भरल्यानंतर त्याची माहिती नोटिफिकेशनद्वारे स्मार्टफोनवर देणारे 'स्मार्ट डस्टबीन ॲप' हे अजय माने आणि पुष्कर कणंगलेकर या विद्यार्थ्यांनी विकसित केले आहे. हे ॲप महापालिका प्रशासनासाठी उपयुक्त ठरणारे आहे. पुष्कर लाटकर या विद्यार्थ्याने 'व्हाईस कंट्रोल लाईट'ॲप हे संशोधन केले आहे. आपल्या घरातील विजेचे दिवे चालू-बंद करण्यासाठी या ॲपचा उपयोग होतो. या ॲपमध्ये गुगल असिस्टंटद्वारे आवाजाच्या माध्यमातून सूचना दिल्यानंतर घरातील दिवे चालू अथवा बंद करता येतील. घरातील प्रकाशानुसार विजेचा वापरदेखील करता येणार आहे. दिव्यांग व्यक्तींसाठी हे ॲप उपयुक्त ठरणारे आहे. विद्यार्थ्यांना संगणकशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. आर. के. कामत, कबीर खराडे, के. एस. ओझा, यु. आर. पोळ, व्ही. एस. कुंभार, स्मिता काटकर, प्रसन्न करमरकर यांचे मार्गदर्शन लाभले.

### 'स्टार्टअप'साठी बळ देणार



या विद्यार्थ्यांनी अ‍ॅण्ड्राईड, इंटरनेट ऑफ थिंग्ज् आणि स्मार्ट सेन्सर यांच्या एकत्रीकरणातून संबंधित ॲप साकारली आहेत. ती निश्चितपणे समाजासाठी उपयुक्त ठरणारी आहेत. या संशोधनाची व्याप्ती वाढवून स्टार्टअपसाठी विद्यार्थ्यांना कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शनातून साकारलेल्या विद्यापीठाच्या इनोव्हेशन अँड इनक्युबेशन सेंटरद्वारे बळ दिले जाणार आहे.

२०१९ वर्षाची संकल्पना नवसंशोधन, नवोपक्रमांवर आधारित आहे. त्याचे स्वागत करताना तरुणाईमधील नवसंशोधन, कल्पनांना संधी देऊन समाजहित साधणे आवश्यक असल्याचे 'शिवाजी सेंटर फॉर इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजीस'चे संचालक प्रा. डॉ. आर. के. कामत यांनी सांगितले.